**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे**
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे ४११००१
सत्यमेव जयते
barti
दूरध्वनी क्र. ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३० फॅक्स :०२०-२६३३ ३५९६
E-mail: dg@barti.in Website: www.barti.in

जा.क्र.बार्टी/पुणे/योजना विभाग/घोषणापत्र/ २०२१-२२ दि:०७/०९/२०२२

## घोषणापत्र

विषय : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे अंतर्गत सुरू असलेल्या महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी बँक, रेल्वे, एल.आय.सी. इत्यादी व तत्सम पदांचे पूर्व प्रशिक्षण तसेच युपी.एस.सी., एम.पी.एस.सी पूर्व प्रशिक्षण चाचणी परीक्षांचे निकाल जाहिर करणे बाबत.

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी बँक, रेल्वे, एल.आय.सी. इत्यादी व तत्सम नोकरीच्या संधी तसेच Aptitude Test आणि Interview वर आधारित खाजगी व कॉर्पोरेट क्षेत्रातील चांगल्या नोकरीच्या संधी याकरीता घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परिक्षांच्या पूर्वतयारी करिता नि:शुल्क अनिवासी प्रशिक्षण (कोचिंग) महाराष्ट्र राज्यातील ३० प्रशिक्षण केंद्रांच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. तसेच युपी.एस.सी., एम.पी.एस.सी पूर्व प्रशिक्षण देखील राबवण्यात येत आहे.

दिल्ली येथील नामवंत प्रशिक्षण संस्थांमध्ये ३०० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी दि.३१/०७/२०२२ रोजी मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद व अमरावती याठीकाणी UPSC-CET-2023 या परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. सदर परीक्षेतील मुलांची अंतिम गुण तालिका यादी बार्टी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच दि.०९/०८/२०२२ रोजी एमपीएससी पूर्व प्रशिक्षणाकरीता नागपूर येथे झालेल्या MPSC-CET-2023 या परीक्षेतील मुलांची अंतिम गुण तालिका यादी बार्टी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

तसेच महाराष्ट्रातील ३० परीक्षा केंद्रांवरती दि.३१/०७/२०२२ रोजी झालेल्या बँक, रेल्वे, एल.आय.सी. इत्यादी व तत्सम पदांच्या परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरीता झालेल्या परीक्षांचे निकाल लावण्याची प्रक्रिया अंतिम स्तरावर असून लवकरच या परीक्षांचे निकाल संबंधीत प्रशिक्षण केंद्रावरती लावण्यात येतील व त्याची गुणतालीका बार्टी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

(उमेश सोनवणे)
**उपायुक्त तथा विभाग प्रमुख**
**योजना विभाग**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**